महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
स.न.४३२ ए, फायनल प्लॉट नं. १७८, १७९,
भांबुर्डा, शिवाजीनगर पुणे ४११००४.
फोन नं. ०२० २५७०८०००
ईमेल secretary.stateboard@gmail.com

क्र.म.मं./लेखा-६/ 1908
पुणे- ४११ ००४
दिनांक 07/05/२०२6

प्रति,
विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळ

विषय-इ.१०वी व इ.१२वी गुणपत्रक/प्रमाणपत्र शुल्काबाबत

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०२६ च्या परीक्षेपासून विद्यार्थ्यांना गुणपत्रक व प्रमाणपत्र एकत्रित छपाई करून देणेबाबतचा विषय दि.०४/०५/२०२६ रोजी झालेल्या कार्यकारी परिषदेमध्ये ठराव क्र ३० अन्वये पारीत झालेला आहे

तथापि इ.१०वी व इ.१२वी फेब्रु/मार्च २०२६ परीक्षेसाठी शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांकडून प्रती विद्यार्थी स्वतंत्र गुणपत्रक रु.२०/- व प्रमाणपत्र रु.२०/- असे शुल्क आकारण्यात आलेले आहे परंतु मंडळाकडून फेब्रु/मार्च २०२६ परीक्षेचे एकत्रित गुणपत्रक व प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे

सबब फेब्रु/मार्च २०२६ च्या परीक्षेपासून व त्या पुढील परीक्षांकरीता विद्यार्थ्यांना देण्यात येणारे गुणपत्रक व प्रमाणपत्रावर क्युआर कोड, विद्यार्थ्यांचा फोटो तसेच साईज अे-४ इ. असणार आहे त्यामुळे जून/जुलै-२०२६ च्या परीक्षेपासून गुणपत्रक रु.२०/- व प्रमाणपत्र रु.२०/- असे स्वतंत्र शुल्क न दाखवता एकत्रितरित्या गुणपत्रक व प्रमाणपत्र शुल्क रु.४०/- आकारण्यात येणार आहे सदर बाब आपल्या स्तरावरून शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ, पुणे-४

क्र.मुंविमं/माध्य.परीक्षा/ 2227
वाशी, नवी मुंबई-४००७०३.
दिनांक- /०५ /२०२६

प्रति,
मुख्याध्यापक/ प्राचार्य
मुंबई विभागीय कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महावि
मुंबई /नवमुंबई /ठाणे /पालघर / रायगड जिल्हे

उपरोक्त पत्रानुसार मुख्याध्यापकांनी आपल्या स्तरावर नोंद घेवून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

(ज्योत्स्ना शिंदे-पवार)
विभागीय सचिव
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

प्रति:-
मुख्याध्यापक /प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा.
प्रत बोध्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:-
१) मा. शिक्षण उपसंचालक, मुंबई.
२) शिक्षणाधिकारी(माध्य), ठाणे/रायगड/पालघर जिल्हा
३) शिक्षण निरीक्षक, पश्चिम/दक्षिण/उत्तर विभाग, मुंबई.
४) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, डहाणू/शहापूर/जव्हार/पेण.
यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना परिपत्रक निदर्शनास आणावे.